प्रेस नोट दिनांक ०५/०६/२०१८

**गाडयांची तोडफोड करणाऱ्या आरोपीस युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहरने केली अटक**

वानवडी पोलीस ठाणे हद्दीत चार दिवसापूर्वी भररस्त्यात गाडी अडवून सदर गाडीची तोडफोड करून आरोपी पळून गेले होते. सदर बाबत अज्ञात तीन इसमां विरुध्द वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होता, सदर गुन्हयाचा समांतर तपास युनिट १ करीत असतांना पो.हवा. तुषार खडके व रिजवान जिनेडी यांना त्यांच्या बातमीदारा मार्फत बातमी मिळाली होती की, दाखल गुन्हयातील आरोपी मंगळवार पेठ, जूना बाजार, पुणे येथे आला असून सदर बाबत युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन भोसले-पाटील यांना कळविले असता, त्यांनी त्याचेवर कायदेशीर कारवाई करणेसाठी आदेश दिलेने त्यास युनिट १ कडील स्टाफच्या मदतीने सापळा लावून पकडून त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पत्ता सनी उर्फ गिरीष महेंद्र हिवाळे, वय २० वर्षे, रा. म्हसोबा नगर, काळेपडळ, रोहीत बर्फ कंपनीचे जवळ, हडपसर, पुणे असे असलेचे सांगीतले.

त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे तपास केला असता, त्याने व त्याचे पळून गेलेले दोन साथीदार यांनी फिर्यादी यांची चारचाकी गाडीस त्यांची मोटार सायकल आडवी लावून फिर्यादीस शिवीगाळ करून होंडा सीटी गाडीची तोडफोड करून मी व माझे साथीदार पळून गेलेबाबत सांगीतले आहे. सदर बाबत फिर्यादी यांनी वानवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील व हर्षल कदम, व पोलीस कर्मचारी रिजवान जिनेडी, तुषार खडके, सचिन जाधव, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, गजानन सोनुने, तुषार माळवदकर, प्रशांत गायकवाड, विजेसिंग वसावे, अशोक माने, यांनी केली आहे.